**पंतप्रधानांशी इस्रायली पंतप्रधानांचा दूरध्वनीवरून संवाद**

10 डिसेंबर 2025

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्याशी आज इस्रायलचे पंतप्रधान माननीय श्री. बेंजामिन नेतन्याहू यांनी दूरध्वनीवरून संवाद साधला.

2. दोन्ही नेत्यांनी भारत-इस्रायलच्या धोरणात्मक भागीदारी मध्ये सातत्याने होत असलेल्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले आणि परस्पर लाभासाठी हे संबंध अधिक मजबूत करण्याची वचनबद्धता पुन्हा अधोरेखित केली.

3. दोन्ही नेत्यांनी दहशतवादाचा तीव्र शब्दात निषेध केला आणि दहशतवादाच्या सर्व स्वरूपांबाबत झिरो टॉलरन्स धोरण कायम असेल याचा पुनरूच्चार केला.

4. यावेळी त्यांनी पश्चिम आशियामधील परिस्थिती बाबतही चर्चा केली. पंतप्रधान मोदी यांनी, गाझा शांतता योजना लवकरात लवकर लागू करण्यासह, या प्रदेशात योग्य व स्थायी शांततेसाठीच्या प्रयत्नांना भारताचा पाठिंबा असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट केले.

5. उभय नेत्यांनी परस्परांच्या संपर्कात राहण्यावर सहमती दर्शवली.

नवी दिल्ली

10 डिसेंबर 2025